रे.दिवाणी दावा क्र. ८५/२०१४
सागर विरुध्द विठ्ठल वगैरे

<u>सीएनआर नं. एमएचपीयु१८-००८६०-२०१४</u>

## नि. १८ वर आदेश

त्रयस्त इसम सचिन सोमनाथ सातव व निलेश रघुनाथ सातव यांनी नि.१८ वर त्यांना प्रस्तुत दाव्यामध्ये सामील करुन घेण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जातील कथनांचा विचार करता वर नमुद अर्जदार यांनी प्रतिवादी क्र. १ यांचेकडुन दावा मिळकत ही रजिस्टर खरेदीदस्त क्र.३६५६/२०१५ दि.१०/०८/२०१५ प्रमाणे खरेदी केलेली आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांची नावे दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यास नोंद झालेली आहेत. सदर खरेदीदस्ताबाबत वादी यांना पुर्वकल्पना असुन वादी यांनी नोटरी ताबा पावती रजिस्टर क्र. १०५५१/२०१५ दि. ०६/०७/२०१५ अन्वये दिलेला आहे. वादी यांनी सदरची बाब या न्यायालयापासुन लपवुन ठेवुन न्यायालयाची दिशाभूल करुन आदेश मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. अर्जदार यांना प्रस्तुत दाव्याची माहिती नुकतीच मिळाल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांना प्रस्तुतकामी सामील करुन घेणे अत्यावश्यक आहे अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला. परंतु आजरोजी वादी यांनी नि.२३ प्रमाणे दावा दुरुस्ती अर्ज अभिलेखावर दाखल करुन प्रस्तुत अर्जातील त्रयस्त इसम व सुहास उत्तर पिलाने यांना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करण्याकरीता व त्याअनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलला आहे.

४. प्रस्तुत अर्जातील कथने , नि.२३ वरील अर्ज व नि. २६ कागदयादी सोबत दाखल कागदपत्रांचा विचार करता प्रस्तुत अर्जातील त्रयस्त इसम हे प्रस्तुत कामी आवश्यक पक्षकार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. त्यामुळे अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीतः

## आदेश

१. अर्जदार/त्रयस्त इसम यांचा नि.१८ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. वादी यांनी प्रस्तुत अर्जातील सचिन सोमनाथ सातव व निलेश रघुनाथ सातव यांना प्रतिवादी म्हणुन सामील करुन घ्यावे.

३.	वादी यांनी त्याअनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांचे आत करुन दावा दुरुस्तीप्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/-

दि.२९/०८/२०२२
ठिकाण - दौंड

(जी.ए. कुलकर्णी)
४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, ता. दौंड, जि. पुणे